**विषय :** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती, अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतूदीनुसार ***"मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकाराचे प्रत्यायोजन".***

## नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

" सामान्य प्रशासन विभाग "

जावक क्रमांक : साप्रवि/आस्था-६/ ४८ /२०१८.

नाशिक, दिनांक : २५ /०१/२०१८.

**वाचा :** ०१.सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक-वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६ /२०१६/ राकावि-२ मंत्रालय मुंबई दिनांक-१६ मार्च, २०१६

०२.महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१).

०३. कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-६/६०/२०१७ दिनांक-२७.०१.२०१७

०४.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची मंजुर टिप्पणी दि. /०१ /२०१८.

**-: आ दे श :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतूदीनुसार प्रदान करणेत आलेल्या, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारांपैकी काही महत्वाचे अधिकार संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये यापुर्वी प्रत्यायोजित करण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये गट-क व गट-ड मधील जिल्हा परिषदेतील सर्व संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांचे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती रु.२,००,०००/- पर्यत मंजुरी बाबतचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रत्यायोजित करण्यात आलेले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक-वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२ मुंबई दिनांक-१६ मार्च, २०१६ अन्वये सुधारित तरतुदीनुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती रु.३,००,०००/- (अक्षरी रु.तीन लाख फक्त) पर्यत मंजुरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वैद्यकीय खर्चाचे रु.३,००,०००/- (अक्षरी रु.तीन लाख फक्त) प्रतिपूर्ती मंजुरीचे अधिकार याद्वारे प्रदान करण्यांत येत आहे. सदर आदेश हा मागील वैद्यकीय देयकांना मंजुरीसाठी देखील लागू राहील. तसेच यापुर्वीचे विहित केलेली कार्यपध्दत अवलंबवावी (उदा.जिल्हा आरोग्य यांचे तांत्रिक सल्यानुसार व वित्त विभागाच्या पडताळणीनुसार ) राहील.**

वरील प्रमाणे प्रदान करणेत आलेल्या अधिकारांमध्ये कोणत्याही वेळी, कोणत्याही कारणास्तव बदल करणेची किंवा काढुन घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहे. प्रस्तुत आदेश "**स्थायी आदेश**" संचिकेत सामील करावा.

Deepak 24/01

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा.अध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.
२.मा.उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.
३.मा.सभापती, विषय समिती ----------------, जिल्हा परिषद, नाशिक.

**प्रत : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.**

१.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्ह परिषद, नाशिक.
२.खाते प्रमुख (सर्व), ......................, जिल्हा परिषद, नाशिक.
३.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
४.सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
५.गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
६.उप अभियंता (ल.पा./इवद/ग्रापापु), जि.प.उपविभाग (सर्व) ........................
७.वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व) ........................